<table>
<tr><td rowspan="5">MHSO200020082020</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">१९/०८/२०२०</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">२९/०८/२०२०</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०२/०५/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>म.</td><td>दि.</td></tr>
<tr><td>०५</td><td>०८</td><td>१४</td></tr>
</table>

## सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला, जि. सोलापूर यांचे न्यायालयात
## (पीठासीन अधिकारीः– श्रीमती ए.ए.पाटील )

**नियमीत दिवाणी दावा क्र. २६१/२०२०.** **नि. क्र. ३२**

**१) नौसाबाई सदाशिव मोरे**
वय – ८० वर्षे धंदा– घरकाम व शेती
**२) काकासो सदाशिव मोरे**
वय– ५५ वर्षे धंदा – शेती
**३) दत्तात्रय सदाशिव मोरे**
वय– ४६ वर्षे धंदा– शेती
**४) हणमंत सदाशिव मोरे**
वय – ३८ वर्षे धंदा– शेती
**५) अर्चना पोपट मोरे**
वय – ३० वर्षे धंदा – घरकाम व शेती
**६) रोहीत पोपट मोरे**
वय– १५ वर्षे धंदा – शिक्षण
**७) अंकिता पोपट मोरे**
वय १३ वर्षे धंदा– शिक्षण

**..... वादी**

वादी नं. ६ व ७ करीता अ.पा.क
वादी नं. ५ जनक आई अर्चना पोपट मोरे
सर्व वादी नं. १ ते ७ रा. मु. पो. मानेगाव
ता. सांगोला, जि. सोलापूर

**विरुध्द**

**१) श्रीमती नंदाबाई आप्पासो मोरे**
वय ५० वर्षे, धंदा– शेती
**२) प्रकाश आप्पासो मोरे**
वय २६ वर्षे, धंदा– शेती
**३) लतीका सत्यवान बाबर**
वय २८ वर्षे, धंदा– शेती
**४) विजय महादेव मोरे**
वय ५७ वर्षे, धंदा– शेती
**५) संगिता विजय मोरे**
वय १५० वर्षे, धंदा– शेती
**६) पांडूरंग छत्रुग्र कोडग**
वय ४२ वर्षे, धंदा– शेती
**७) अर्जुन छत्रुग्र कोडग**
वय ३६ वर्षे, धंदा– शेती
**८) सुभाष राजाराम कदम**
वय ३५ वर्षे, धंदा– शेती
**९) समाधान राजाराम कदम**
वय ३२ वर्षे, धंदा– शेती

.... **प्रतिवादी**

**१०) भारत शिवाजी मोरे**

वय ५० वर्षे, धंदा– शेती

**११) बाळासो शिवाजी मोरे**

वय ४३ वर्षे, धंदा– शेती

प्रतिवादी नं. १ ते ७ व १०, ११ .... **प्रतिवादी**

रा. मु. पो. मानेगाव ता. सांगोला जि. सोलापूर

प्रतिवादी नं. ८ व ९ रा. मु. पो. निजामपूर

ता. सांगोला जि. सोलापूर

---

**वादीतर्फे विधीज्ञ** – **अॅड. श्री.आर.आर.केदार**

**प्रतिवादी क्र.१ तर्फे** – **अॅड. श्री. एस.एन.वाघ**

**प्रतिवादी क्र. ४ व ५ तर्फे** – **अॅड. श्री. पी.डी.दिवटे**

**प्रतिवादी क्र. ६ व १० तर्फे** – **अॅड. श्री. डी.व्ही.तंडे**

**प्रतिवादी क्र. २,३, ७ ते ९ व ११ तर्फे – एकतर्फा चौकशी**

---

## न्यायनिर्णय.

(**दिनांक ०२/०५/२०२६ रोजी घोषीत**.)

**०१.** वादींनी प्रस्तुत दावा वाटपाचा व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीप्रमाणेः–**

**०२.** जिल्हा सोलापूर, उपविभाग सांगोला, ता. सांगोला, पैकी मौजे मानेगाव येथील जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र हे–आर. | आकार रु.– पै. |
|---|---|---|---|
| १. | ४४६/१ | ४–१४ | ३–५० |
| पैकी वाटपास पात्र | | ०–७९.७८ | ०–६५ |
| २. | ४४८/३ | ०–६२ | ०–३० |
| ३. | ४७२/१ | ०–६० | १–२० |
| पो.ख. | | ०–०१ | |
| ४. | २०७/४ | १–३७ | ०–६५ |
| पैकी वाटपास पात्र | | १–०२.७५ | ०–४८ |

येणेप्रमाणे शेतजमिन ही वाद मिळकत असून त्यास यापुढे सोयीकरीता ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येते.

**वादींची दाव्यातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

**०३.** दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या समाईक मालकी वहीवाटीच्या मिळकती आहेत. दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे दरम्यान अद्याप पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतीमध्ये वादी नं. १ ते ४ प्रत्येकी १/६ व वादी नं. ५ ते ७ यांचा एकत्रात १/६ व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा एकत्रात १/६ अविभक्तात हिस्सा आहे. दावा मिळकती वादींना एकत्रात वहीवाट करणे

अडचणीचे होवू लागल्याने तसेच प्रतिवादी नं. १ ते ३ हे त्यांच्या हिश्याच्या मिळकती दिशा बाजू दाखवून त्रयस्थ इसमास विक्री करणार असल्याचे बोलून दाखवू लागल्याने वादींनी प्रतिवादी नं. १ ते ३ यांना दि. १५/८/२०२० रोजी दावा मिळकतीचे वाटप करून मागीतले. तेव्हा प्रतिवादींनी वाटपास स्पष्ट नकार दिला व दावा मिळकती विक्री करण्याची धमकी दिली. सबब वादीस हा दावा वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल करणे भाग पडले आहे.

**०४.** वादी नं. ६ व ७ हे अज्ञान असून वादी नं. ५ ही वादी नं. ६ व ७यांची जनक आई आहे. वादी नं. ६ व ७ यांची अज्ञान पालन कर्ता वादी नं. ५ ही आहे. वादी नं. ५ ते ७ यांचे दरम्यान दावा मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारचे परस्पर विरोधी हितसंबंध नाहीत. वादी नं. ५ हीने स्वतः करीता व वादी नं. ६ व ७ यांचे भल्याकरीता व त्यांचे हिताचे रक्षण करण्याकरीता सदरचा दावा दाखल केलेला आहे.

प्रतिवादी नं. ४ व ५ हे जमीन गट नं. २०७/४ मधील खरेदीदार आहेत. प्रतिवादी नं. ४ व ५ यांना दाव्याचे कामी पक्षकार केलेले आहे. प्रतिवादी नं. ४ व ५ यांचे खरेदीखताबाबत वादीची कोणतीही हरकत नाही. तसेच प्रतिवादी नं. ६ ते ११ हे गट नं. ४४६/१ मधील सहहिस्सेदार आहेत. सबब प्रतिवादी नं. ६ ते ११ यांना दाव्यात पक्षकार केलेले आहे. प्रतिवादी नं. ४ ते ११ यांचे विरूध्द वादींची कोणतीही मागणी

नाही.

**०५.** सबब, वादींचा दावा मंजूर करण्यात यावा. वरील प्रमाणे दाव्यात नमूद केलेल्या सर्व कारणास्तव दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे वादी नं. १ ते ४ यांना प्रत्येकी १/६ हिश्याने व वादी नं. ५ ते ७ यांना एकत्रात १/६ हिश्याने सरस निरस मानाने मोजून मापून वाटप होवून मिळावे. तसेच, वाटपाने मिळालेल्या जमीन मिळकतींचा पृथक कब्जा वादींना मे. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मार्फत मिळावा, अशी विनंती केली आहे.

**०६.** प्रतिवादी क्र. ६ व १० यांनी नि.क्र. १३ कडे त्यांची कैफियत दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांनी वादीच्या दाव्यातील कथनांना पुष्टी देऊन नाहरकत दर्शविली आहे.

**०७.** प्रतिवादी क्र. १, ४ व ५ यांनी हजर होऊन देखील दाव्यास कैफियत दिली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विनाकैफियतीचा आदेश पारित करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र. २,३,७ ते ९ व ११ यांना दाव्याचे समन्स मिळून सुध्दा ते दाव्याकामी हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला.

**०८.** वादीतर्फे अॅड आर.आर.केदार यांचा युक्तिवाद ऐकला.

**०९.** प्रस्तुत प्रकरणातील दाव्याचे व कागदपत्राचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझेसमोर उपस्थित झाले. सदर मद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणेः –

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे शाबित करतात का की, दावा मिळकत ही त्यांची हिंदू एकत्र कुटुंबाची मिळकत आहे ? | होकारार्थी |
| २. | वादी हे शाबित करतात का की, ते वाटप होऊन मिळण्यास पात्र आहेत ? असल्यास प्रत्येकाचा हिस्सा किती? | होकारार्थी. अंतिम आदेशाप्रमाणे |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा ? | दावा अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**१०**. वादीने प्रस्तुत दावा सिध्द करण्यासाठी नि. ४ कडे मौजे मानेगाव येथील जमीन गट नं. ४४६/१, गट नं. ४४८/३, गट नं. ४७२/१ व गट नं. २०७/४ इ. चे ७/१२ उतारे दाखल केले आहे.

**११.** वादी क्र.४ यांनी त्यांचे स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.३० कडे

दाखल केले आहे. वादीने त्यांचे पुराव्यामध्ये वादी यांचे दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेतला नाही. वादीने नि.क्र.३१ कडे पुरावा संपलेबाबतची पुरशिस दाखल केलेली आहे.

**<u>मान्य असलेल्या बाबी</u> –**

**१२.** प्रतिवादी नं. ४ व ५ हे जमीन गट नं. २०७/४ मधील खरेदीदार आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. ४ व ५ यांना दाव्याचे कामी वादीने पक्षकार केलेले आहे. तसेच प्रतिवादी नं. ४ व ५ यांचे खरेदीखताबाबत वादीची कोणतीही हरकत नाही. याबरोबरच, प्रतिवादी नं. ६ ते ११ हे गट नं. ४४६/१ मधील सहहिस्सेदार आहेत. परंतु, त्यांचे मालकी क्षेत्र हे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या समाईक क्षेत्रामध्ये नाही. त्यामुळे वादींची प्रतिवादी नं. ४ ते ११ यांचे विरूध्द कोणतीही मागणी नाही. अभिलेखावर दाखल केलेल्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता हे निदर्शनास येते की, वरील प्रतिवादी यांचे नाव जमीन गट नं. २०७/४ व ४४६/१ यामध्ये जरी समाविष्ट असल्याचे दिसून येत असले तरी त्यांच्याकडे स्वतंत्र व वेगवेगळे क्षेत्र दाखवलेले आहे. तसेच, वादीमध्ये व प्रतिवादी क्र. ४ ते ११ यांच्यामध्ये संयुक्त मालकी असल्याचा कोणताही दस्त दाखल नाही. तसेच, सदर प्रतिवादी हे वादग्रस्त मालमत्तेचे संयुक्त सहमालक नसून स्वतंत्रधारक आहेत असे

ठरते. परिणामी त्यांच्या हिश्याबाबत कोणताही स्वतंत्र मुद्दा ठरविण्याची आवश्यकता नाही.

## <u>मुद्दा क्र.१ व २ बाबत विवेचन</u> –

**१३.** सदरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने अभिलेखावरील पुरावा तसेच तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रित चर्चिले आहेत.

**१४.** वादीचे अभिलेखावरील पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाचा व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ यांच्या घराण्याचा मूळ पुरुष हा सदाशिव हे होते. ते मयत असून नौसाबाई ही पत्नी व उभयंतांना आप्पासो, काकासो, दत्तात्रय, पोपट व हणमंत अशी पाच मुले आहेत. त्यापैकी आप्पासो व पोपट मयत आहेत. आप्पासो यांची नंदाबाई ही पत्नी असून प्रकाश व लतिका ही मुले आहेत. तसेच, मयत पोपट यांची अर्चना ही पत्नी असून त्यांना रोहित व अंकिता अशी मुले आहेत. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ व ५ हे जमीन गट नं. २०७/४ मधील खरेदीदार आहेत. त्यामुळे त्यांना दाव्याकामी पक्षकार केलेले आहे. तसेच, त्या खरेदीखताबाबत वादींची कोणतीही हरकत नाही. याबरोबरच, प्रतिवादी ६ ते ११ हे गट नं. ४४६/१ मधील

सहहिस्सेदार आहे. त्यामुळे त्यांना दाव्यात पक्षकार केलेले आहे.

**१५.** नि.३० खाली वादी क्र.४ यांनी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, वाद मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या समाईक वहिवाटीच्या मिळकती आहेत. तसेच, त्यांच्यामध्ये अदयापपर्यंत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही, असे वादींचे कथन आहे. सदर साक्षीदाराने दाव्यातील वादींच्या कथनांची पुनरावृत्ती केली आहे.

**१६.** अभिलेखावर दाखल नि.क्र.४ खाली वाद मिळकत गट नं. ४४६/१ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, एकूण क्षेत्र ४हे–१४ आर त्यापैकी वाटपास पात्र असलेले ०हे–७९.७८ आर यामध्ये भोगवटदार वर्ग–१ म्हणून वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या नावे दिसून येते. तसेच गट नं. ४४८/३ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यामध्ये समाईक क्षेत्र ०हे–६२ आर असल्याचे दिसून येते. गट नं. २०७/४ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्या नावे १ हे–०२.७५ आर एवढे क्षेत्र समाईकात असल्याचे दिसून येते. तसेच, गट नं. ४७२/१ मधील ०हे–६० आर क्षेत्र समाईकात वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या नावे आहे. वरील कागदोपत्री पुराव्याच्या अवलोकनाअंती हे सिध्द होते की, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यामध्ये वाद मिळकत ही हिंदू एकत्र कुटुंबाची

समाईकातील मिळकत आहे. मूळ पुरुष सदाशिव मोरे हे दि. १३/०३/२००६ रोजी मयत झाल्याचे साक्षीदार यांच्या सरतपासामध्ये कथन आहे. त्याबरोबरच, वादी क्र. १ ते ४ यांचा प्रत्येकी १/६ व वादी क्र. ५ ते ७ यांचा एकत्रात १/६ तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा एकत्रात १/६ अविभक्त हिस्सा असल्याचे जे साक्षीदाराने कथन केले आहे ते प्रस्तुत दाव्यामध्ये विनाआव्हानित राहिले आहे. त्यामुळे वादी यांनी वाद मिळकती या आवश्यक त्या पुराव्यानिशी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या समाईकातील मिळकती असल्याचे शाबित केले आहे. त्यामुळे वादी क्र. १ ते ४ यांना प्रत्येकी १/६ व वादी क्र. ५ ते ६ यांचा एकत्रात १/६ व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा एकत्रात १/६ अविभक्त हिस्सा असल्याने त्याचे वाटप होऊन कब्जा मिळणेस पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविते व मुद्दा क्र. ३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करते.

## आ दे श

**१.** वादींचा दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** दावा मिळकतीत वादी क्र. १ ते ४ यांना प्रत्येकी १/६ व वादी क्र. ५ ते ६ यांचा एकत्रात १/६ व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा

एकत्रात १/६ अविभक्त हिस्सा आहे असे जाहीर करण्यात येते.

**३.** दावा मिळकत ही शेतजमिन असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठवण्यात यावा.

**४.** येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व घोषीत करण्यात आला.)**

PATIL ARTEE ASHOKRAO

Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2026.05.02 14:49:05 +0530

**स्थळ** – सांगोला.

**दि**. ०२/०५/२०२६.

(श्रीमती ए.ए.पाटील)

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर

सांगोला, जि. सोलापूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.S.Kolekar |
| (b) | Court | : | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 02/05/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 02/05/2026 |